# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## शैक्षणिक, संशोधन व विकास
## परिपत्रक

NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA-2.62)

---

**वाचा : उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/(१२५/१८)/मशि-३ दि. १४ नोव्हेंबर २०१८**

मा. प्राचार्य / संचालक व संस्थापक, सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना उक्त परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनायाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी अभ्यांगत / तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधन व तासिका तत्वावर नियुक्ती देताना सुधारीत अटींबाबत कळविले आहे. सोबत सदर शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार तासिका तत्वावर नियुक्ती देताना काही अटींमध्ये सुधारणा केली असून **सदर शासन निर्णय १४ नोव्हेंबर २०१८ पासून अंमलात आणण्याबाबत आदेश दिले आहेत.** त्यातील काही अटी खालील प्रमाणे आहेत.

१. तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करण्यापूर्वी विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचे कार्यालयाकडून संबंधीत विषयाचा कार्यभार तपासून **ना-हरकत प्रमाणपत्र** घेणे आवश्यक आहे.

२. **एका पूर्णवेळ रिक्त पदाकरिता फक्त दोनच** तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणूका करता येतील. एका अध्यापकाकडे जास्तीत जास्त ०९ तासिकांचा कार्यभार सोपविण्यात यावा.

३. संस्थेने **विद्यापीठ मान्यतेने जाहिरात** देवून विद्यापीठ अनुदान आयोग/शिखर संस्था/शासन यांनी वेळोवेळी विहित केलेली अर्हता व पात्रताधारक अध्यापकांची स्थानिक निवड समितीमार्फत निवड करावी. ज्यामध्ये संस्थाप्रमुख, प्राचार्य, विभागप्रमुख व **एक बाहय विषय तज्ज्ञ** असावा.

४. तासिका तत्वावरील अध्यापकांची **एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी** तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात यावी व त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्यात यावी. त्यानंतर ही नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

५. तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरूपातील असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतही हक्क प्राप्त होत नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी / नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही, तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल, असे **हमीपत्र रू.१००/- स्टॅम्प पेपरवर** संबंधीत अध्यापकाकडून रूजू होते वेळी घेण्यात यावे.

**याबाबत उर्वरीत सर्व अटी शासननिर्णयामध्ये नमुद केल्या आहेत त्या पहाव्यात.**

**उपरोक्त शासन निर्णय अवलोकनी घेता आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता यापूर्वी ज्या महाविद्यालयांना सत्र-१ व सत्र-२ करीता तासिका तत्वावर मान्यता दिलेली आहे अशा सर्व मान्यता या फक्त सत्र-१ साठी समजण्यात याव्यात व सत्र-२ करीता १५ फेब्रुवारी २०१९ पर्यंत नव्याने शासन निर्णयानुसार सुधारीत प्रक्रीया करून प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठवावेत. सदर प्रस्ताव पाठविताना संबंधीत शिक्षकास सन २०१८-१९ करीता जास्तीत जास्त ९ महिने पर्यंत नियुक्ती देता येते याची नोंद घ्यावी.**

आपल्या महाविद्यालयातील स्थानिक निवड समितीचा प्रस्ताव सोबत जोडलेल्या विहित Proforma मध्ये पाठवावा व तो परिपूर्ण असावा. कारण अपूर्ण प्रस्तावांवर कार्यवाही करणे अडचणीचे होईल. सबब, महाविद्यालयाने/संस्थेने स्थानिक निवड समितीचा प्रस्ताव पाठविताना खालील सूचनाचे काटेकोरपणे पालन करावे म्हणजे मान्यता प्रक्रियेस विलंब होणार नाही.

१. स्थानिक निवड समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेल्या Proforma मध्येच असावा. (सदरचा Proforma विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Academic, Research and Development या मथळयाखाली Teacher Approval Section-I या लिंकवर उपलब्ध आहे.

२. स्थानिक निवड समितीच्या कार्यवृत्तांतात नमूद केल्यानुसार संस्था अध्यक्ष/सचिव, महाविद्यालयाचे प्राचार्य व संबंधित विषयाच्या विषयतज्ज्ञाची स्वाक्षरी, तसेच अभ्यासक्रमाचा उल्लेख असणे अनिवार्य आहे.

३. प्रस्तावासोबत बी फॉर्म, जाहिरातीचे कात्रण, मा. विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या कार्यालयाने दिलेली पदमान्यतेची साक्षांकित प्रत, नाहरकत प्रमाणपत्र सोबत जोडावे.

४. प्रस्तावासोबत बी फॉर्म मध्ये दिलेली संपूर्ण माहिती भरून सदरची माहिती पडताळणी करणे आवश्यक आहे.

५. समितीने शिफारस केलेल्या उमेदवाराची संबंधित विषयाची अनिवार्य असलेली पदवी व पदव्युत्तर पदवी अंतिम गुणतक्ता व पदवी प्रमाणपत्र प्राचार्यांनी नियमाप्रमाणे सांक्षांकित करुन प्रस्तावासोबत जोडावेत. अनावश्यक कागदपत्रे सोबत जोडू नयेत. (उदा. MSCIT, डिप्लोमा, अनुभव प्रमाणपत्रे, पुर्वीची मान्यता पत्रे इत्यादी.)

६. सदर प्रस्तावासोबतचे महाविद्यालयाचे पत्र, जाहिरातीचे कात्रण, स्थानिक निवड समिती अहवाल, सर्व बी. फॉर्म, शैक्षणिक कागदपत्रे यांचे स्क□करून PDF मध्ये स□ट कॉपी प्रस्तावासोबत सादर करावी.

७. काही महाविद्यालये प्रभारी प्राचार्यांची निवड स्थानिक निवड समितीमार्फत करतात व सदर प्रस्ताव मान्यतेस्तव पाठवितात. तथापी प्रभारी प्राचार्यांची निवड प्रक्रिया स्थानिक निवड समिती मार्फत होत नाही. त्यामुळे सदर आलेले प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही न करता ते दप्तरी दाखल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

८. तसेच तासिका तत्वावर नियुक्ती साठीचे प्रस्ताव विद्यापीठाच्या विहित नमुन्यात देणे अनिवार्य असून इतर नमुन्यामधील प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

**स्थानिक निवड समिती अहवाल प्रस्ताव तक्ता**

| अ. क्र. | तपशील | | | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | महाविद्यालयाचे पत्र | | | | १ |
| ०२ | स्थानिक निवड समिती अहवाल प्रस्ताव तक्ता | | | | २ |
| ०३ | विभागीय सहसंचालक यांचे पदमान्यता पत्र | | | | ३ |
| ०४ | विभागीय सहसंचालक यांचे नाहरकत प्रमाणपत्र | | | | ४ |
| ०५ | जाहिरातीचे कात्रण | | | | ५ |
| ०६ | स्थानिक निवड समितीचा कार्यवृत्तांत (विषयनिहाय) | | | | ६ |
| ०७ | फॉर्म बी. (उमेदवारनिहाय) (जन्मतारखेचा उल्लेख करावा, पुराव्यासह) | | | | ७ |
| ०८ | उमेदवाराचे नाव | विषय | कालावधी | शैक्षणिक अर्हता | |
| | (उमेदवारांची संख्या एकापेक्षा जास्त असल्यास अ. क्र. ८, ९, १०... याप्रमाणे तक्ता तयार करून उमेदवार निहाय पृष्ठक्रमांक घालावेत) | | | पदवी (टक्केवारी) **(उदा. बी.ए. - ५८.३६)** | ८ |
| | | | | पदव्युत्तर(टक्केवारी) **(उदा. एम.ए. - ६०.४८)** | ९ |
| | | | | जात वैधता प्रमाणत्र (अवश्यकतेनुसार) | १० |
| | | | | अपंगप्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार) | ११ |

९. **तसेच प्रस्तावासोबत जोडावयाचा वरीलप्रमाणे स्थानिक निवड समिती अहवाल प्रस्ताव तक्ता Word file (PDF करू नये) या नमून्यामध्ये DVB-TTSurekh अथवा DVBW-TTSurekh या फॉन्ट मध्ये व १६ या फॉन्ट साईजमध्ये सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी प्रस्तावासोबत या कार्यालयास सादर करावी.**

**नमूना**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | विषय | कालावधी | शैक्षणिक अर्हता | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री/श्रीमती------------ | मराठी | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी जास्तीत जास्त ९ महिने | बी.ए. (५०%)<br>एम.ए.(५५%)<br>सेट-२०१७ | ८<br>९<br>१० |

वरीलप्रमाणे विनाविलंब व परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यावर शिक्षक मान्यतेची त्वरीत कार्यवाही करणे सोईचे होईल. अपुर्ण व विलंबाने आलेले प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात येतील. याची नोंद घ्यावी.

**जा.क्र.. सोविसो/शिमा/परिपत्रक/२०१८-१९/१०९४९**
**दिनांक : २४/१२/२०१८**

**सही/-**
**(प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील)**
**विशेष कार्यासन अधिकारी,**
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/संस्थाचालक,**
सर्व संलग्न महाविद्यालय व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३,**
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १४ नोव्हेंबर, २०१८.

**वाचा:** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.टीईडी-२००८/(१८३)/०८/तांशि-५, दिनांक ०५ नोव्हेंबर,२००८

**प्रस्तावना :-**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सैद्धांतिक, प्रात्यक्षिके इत्यादी कामांकरीता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अभ्यांगत अध्यापकांचे मानधनाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेले मानधनाचे दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वांगीन विचार करुन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या अभ्यांगत / तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार | दिनांक ०५.११.२००८ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेले दर (प्रति तासाकरीता) | | सुधारित दर (प्रति तासाकरीता) | |
|---|---|---|---|---|---|
| | | सैद्धांतिक | प्रात्यक्षिके | सैद्धांतिक | प्रात्यक्षिके |
| १. | कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी) | रु. ३००/- | रु. १५०/- | रु.५००/- | रु.२००/- |
| २. | कला, वाणिज्य, विज्ञान (पदव्युत्तर) | रु. ३००/- | रु. १५०/- | रु.६००/- | रु.२५०/- |
| ३. | शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु. ३००/- | रु. १५०/- | रु.६००/- | रु.२५०/- |
| ४. | विधि (पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु. ३००/- | रु. १५०/- | रु.६००/- | रु.२५०/- |

२. वरील सुधारीत दर पुढील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात यावे. :-

१) तासिका तत्वावर अध्यापकांची नियुक्ती करण्यापूर्वी संस्थेतील संबंधित विद्याशाखेतील सर्व शिक्षकीय तसेच प्रशासकीय पदावर काम करणाऱ्या शिक्षकांना प्रमाणकानुसार शैक्षणिक भार देण्यात आला आहे याची खात्री करण्यात यावी.

२) तासिका तत्वावरील अध्यापकांची नियुक्ती करण्यापूर्वी विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचे कार्यालयाकडून संबंधित विषयाचा कार्यभार तपासून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

३) एका पूर्णवेळ रिक्त पदाकरिता फक्त दोनच तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नेमणुका करता येतील. एका अध्यापकाकडे जास्तीत जास्त ०९ तासिकांचा कार्यभार सोपविता येईल.

४) संस्थेने विद्यापीठ मान्यतेने जाहिरात देऊन विद्यापीठ अनुदान आयोग/ शिखर संस्था/ शासन यांनी वेळोवेळी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रताधारक अध्यापकांची स्थानिक निवड समितीमार्फत निवड करावी. ज्यामध्ये संस्थाप्रमुख, प्राचार्य, विभागप्रमुख व एक बाह्य विषय तज्ज्ञ असावा.

५) तासिका तत्वावरील अध्यापकांची एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात यावी व त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्यात यावी. त्यानंतर ही नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

६) तासिका तत्वावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याने त्यास नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत, त्यामुळे भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/ नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही, तसेच त्यास एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करता येईल, असे हमीपत्र रु. १००/- स्टॅम्प पेपरवर संबंधित अध्यापकाकडून रुजू होते वेळी घेण्यात यावे.

७) तासिका तत्वावरील कोणत्याही उमेदवारास एकाच महिन्यात त्याच्या दर्जाच्या अनुज्ञेय वेतनश्रेणीतील सुरुवातीच्या वेतनश्रेणीच्या रक्कमेपेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संस्थेचे संचालक तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण यांची राहील.

८) तासिका तत्वावरील नियुक्त अध्यापकांना त्यांचे मानधन दरमहा नियमित स्वरुपात सेवार्थ/एचटीई सेवार्थ प्रणालीमार्फत अदा करण्यात यावे.

९) महाविद्यालयात कार्यरत पूर्णवेळ अध्यापकांना तासिका तत्वावरील दिलेली अतिरिक्त नियुक्ती मान्य केली जाणार नाही अथवा मानधन मिळण्यास पात्र होणार नाही.

१०) अभ्यांगत निमंत्रित हे संबंधित अभ्यासक्रमाशी निगडित व्यवसायातील तज्ज्ञ व्यक्ती पुरते मर्यादित राहतील. अशा अनुभव संपन्न व्यक्तीना व्याख्यानासाठी पाचारण करण्यात यावे, मात्र त्यांना अभ्यास पूर्ण करण्याच्या दृष्टीने निमंत्रित करण्यात येऊ नये.

११) प्रत्यक्ष उपलब्ध कार्यभार आणि तासिका तत्वावरील मानधन अदायगीबाबत काही अनियमितता आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संस्थेचे संचालक तसेच सहसंचालक, उच्च शिक्षण यांची राहील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.७०८/२०१८/व्यय-५, दि.०१.०९.२०१८ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१८१११४१२२९३९०५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Hemantkumar Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec5420633722d42e0976d82a8, serialNumber=284a4236ae7795d36dd2ecb5ac6ca70c333a3cf1b13f66828d224ae2026b37e9, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2018.11.14 12:39:41 +05'30'

**(हे.पं.बाविस्कर)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १-२, मुंबई / नागपूर.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १-२, मुंबई / नागपूर.
५. वित्त विभाग, व्यय ५, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव/मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
७. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी.
८. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/मशि-३.

# महाविद्यालयांचे संस्थेचे नावं

दि.   /   /२०

## स्थानिक निवड समितीचा कार्यवृतांत

संस्थेच्या --------------------------------------------------------------------- या महाविद्यालयामध्ये ----------------- या विषयाच्या अधिव्याख्यात्याची निवड करण्यासाठी नियुक्त केलेल्या निवड समितीची बैठक दि.   /   /२०     रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | हुद्दा | नावं | उपस्थित / अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १. | चेअरमन गर्व्हनिंग बॉडी / संस्था अध्यक्ष | | |
| २. | महाविद्यालयाचे प्राचार्य | | |
| ३. | विभाग प्रमुख | | |
| ४. | बाहय विषय तज्ञ | | |

जाहिरातीस प्रतिसाद म्हणून ----------- अर्जदारांनी सदर जागेसाठी अर्ज केले. त्यापैकी एकूण ----------- अर्जदारांना मुलाखतीस बोलाविण्यात आले. त्यांची यादी माहितीसह सोबत जोडली आहे.

उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, त्यांचा शिकविण्याचा अनुभव व महाविद्यालयाची आवश्यकता लक्षात घेवून ----------------------------------------------- या विषयात भरावयाच्या (SC/ST/OBC/OPEN/Other) ------------- जागेसाठी निवड समितीने एकूण ------------ अर्जदारांच्या मुलाखती घेतल्या व खालील उमेदवारांची निवड केली.

| अ.क्र. | नावं | प्रवर्ग | मान्यता देण्याचा कालावधी (जास्तीत जास्त ९ महीने) |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |

निवड समितीने उमेदवारांची शिफारस करताना वरील उमेदवाराबाबत योग्य तो विचार करूनच सदरच्या जागेवर वरील उमेदवाराची निवड केली आहे.

| अ.क्र. | हुद्दा | नावं | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | चेअरमन गर्व्हनिंग बॉडी / संस्था अध्यक्ष | | |
| २. | महाविद्यालयाचे प्राचार्य | | |
| ३. | विभाग प्रमुख | | |
| ४. | बाहय विषय तज्ञ | | |

**ठिकाण :**

**दिनांक :**

**Form- B**

Information in respect of Candidates recommended by the selection committee for the post of **Teacher on CHB Basis**

(To be sent along with the selection committee Report)

**1.** Name :______________________________________ **2.** Date of Birth : ________________________

**3.** Caste : ______________________________ **4.** Post for Which applied : ________________

**5.** Educational Qualification :

| Examination Passed | University / Board | Month & Year of Passing | Subject offered stating whether major special / Principal (Wherever applicable) | Percentage of Marks | Class / Division / Grade | Remarks and additional qualifications..If any |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| **6.** Whether the Candidate Possessed a consistently good academic record : | | | | | | |
| **7.** Whether the candidate obtained higher second class at the Master Degree Examination : | | | | | | |
| **8.** Teaching Experience (If any) | | | | | | |
| Institute Name (College/University Dept) | University | Subject & Position Classes held | Nature of Appointment | Period of appointment with dates | Last pay drawn in the Institution | Remark (Professional / Teaching ) |
| | | | | | | |
| | | | | | | |
| **9.** Copy of advertisement inviting for the post | | | | | | |
| **10.** Additional Information (If any) | | | | | | |

**Secretary of the Governing Body of the College**

**Place :**

**Date :**